# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापण मंडळ )**


एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३२० E-mail Id – coegondwana@gmail.com


जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/ 4031 /२०२२ दि. २८/०६/२०२२

## शैक्षणिक सत्र २०२२–२३ करिता प्रवेशासंबंधी सुचना

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, पदव्युत्तर शैक्षणिक विभागप्रमुख व विद्यार्थी तसेच संबंधीतांना सुचित करण्यात येते की, पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधी विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०२२–२३ चे **Academic Calender संदर्भ क्रं. No./GU/Acad/409/2022** दिनांक ३१/०५/२०२२ नुसार विविध अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेश घेण्याची प्रक्रिया दि. २८/०६/२०२२ पासून संगणकीय Online प्रणालीद्वारे **gug.digitaluniversity.ac** किंवा **unigug.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून प्रथम सेमीस्टर करीता प्रवेश देण्याची प्रक्रिया दिनांक ३१ ऑगस्ट २०२२ रोजी सांय. ५. ३० पर्यंत पूर्ण करावी. त्यानतंर विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास व काही अडचण निर्माण झाल्यास संबंधीत महाविद्यालय जबाबदार राहील यांची नोंद घ्यावी.

## प्रवेशाकरीता महाविद्यालयांना आवश्यक सुचना

१) प्रथम सेमीस्टर करीता प्रवेश देत असतांना विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम निहाय अचूक विषय निवडलेले आहेत किंवा नाही याची खात्री करावी.

२) विद्यार्थी/विद्यार्थीनीचे पूर्ण नाव, (इंग्रजी व मराठी) आईचे नाव, जन्म तारीख, मतदार नोंदणी क्रमांक, आधार क्रमांक,जात, लिंग, माध्यम,मोंबाईल नंबर व पत्ता, याची अचूक नोंद करावी.

३) सेमीस्टरची निवड तसेच शैक्षणिक वर्ष अचुक नोंदवावे.

४) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता इतर विद्यापीठाचे स्थानांतरंण प्रमाणपत्र व या विद्यापीठाचे योग्यता प्रमाणपत्र स्विकारून व पडताळणी करूनच विद्यार्थ्याचे प्रवेश निश्चित करण्यात यावेत.

५) अभ्यासक्रमानुसार मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

६) प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव प्रवेश रदद् करावयाचा असल्यास विनंती अर्ज प्राचार्यांमार्फत सादर करून विद्यापीठाकडून प्रवेश रदद् करून घ्यावा.

७) विद्यापीठाचे निदेश(Direction),परीपत्रके, अधिसूचना नुसारच आवश्यक कागदपत्राची (Documents) तपासणी करून नियमानुसार अभ्यासक्रमामध्ये प्रवेश देण्यात यावा. चुकीचे प्रवेश देण्यात आल्यास नामांकन केल्या जाणार नाही, व याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील यांची नोंद घ्यावी.

28.6.2022

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली